# राष्ट्रीय हरित लवादा कडून आरे येथील मेट्रो 3 कार डेपो ला हिरवा कंदील

वनशक्ती आणि इतर विरुद्ध भारत सरकार  क्रमांक ३४/२०१५ या अर्जावर राष्ट्रीय हरित लवादासमोर जुलै २०१५ पासून सुनावणी चालू होती. आज दिल्ली येथे झालेल्या अंतिम सुनावणीत राष्ट्रीय हरित लवादाच्या प्रमुख पीठाने अर्जदारांना अर्ज मागे घेण्याचे अन्यथा आदेश निर्गमित करून अर्ज निकाली काढण्यात येईल असे निर्देश दिले. त्यानंतर अर्जदार संस्था वनशक्ती ने आपला अर्ज मागे घेतला आणि हे प्रकरण अंतिमतः निकाली निघाले.

याआधी दि १४/५/२०१८ रोजी हरित लवादाने अंतरिम आदेश काढून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशला अंतिम आदेश होईपर्यंत सदर जागेत डेब्रिज टाकणे, भराव टाकणे आणि वृक्षतोड करणे या साठी तात्पुरती मनाई केली होती. अर्जदारांकडून सातत्याने हरित लवादाच्या यापूर्वीच्या दि २०/७/२०१५ आणि १९/८/२०१५ रोजीच्या आदेशांचा हवाला देऊन या प्रकरणी जैसे थे आदेश असल्याचा दावा केला जात होता.

तथापि राष्ट्रीय हरित लवादाच्या मुख्य पीठाने असे स्पष्ट निरीक्षण नोंदवले की अर्जदारांची प्रमुख विनंती ही संजय गांधी राष्ट्रीय उद्याना भोवती संवेदनशील क्षेत्र घोषित करणे अशी होती आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने दि ५/१२/२०१५ च्या अधिसूचनेद्वारे असे संवेदनशील क्षेत्र घोषित पूर्वीच केले असल्याने आणि त्यातून आरे येथील कर डेपोचे क्षेत्र वगळले असल्याने त्यांची मूळ विनंती निरर्थक ठरली आहे.

या संदर्भात आपले अभिप्राय देताना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन च्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे म्हणाल्या, " आता सर्व कायदेशीर अडचणी दूर झाल्याने कार डेपोचे आणि पर्यायाने प्रकल्पाचे काम अधिक गतिमान करणे शक्य होईल".